FIRST APPEAL UNDER SECTION 19(1) OF THE RIGHT TO INFORMATION ACT, 2005

ANNEXURE "B"

See Rule 5(1)

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./अ.प. अपील
आवक क्र. 03/2019-20
दिनांक:- 08/11/2019

To,

**First Appellate Authority,**

**Municipal Secretary Dept. - MBMC.**

| | |
|---|---|
| 1. Name of the Applicant | **Pravin Parmar** |
| 2. Address<br><br>**(Intimation on email preferred)** | **pravinparmar.981@gmail.com**<br>Mobile: 9819489991 |
| 3. Particulars of Public Information Officer | Public Information Officer,<br>Shri Kailash Mhatre<br>Municipal Secretary Dept.- MBMC |
| 4. Date of receipt of the order appealed against ( if the order passed ) | 01/11/2019 |
| 5. Last date for filing the appeal | 01.12.2019 |

6. The grounds for appeal: -

1) Information was sought for the period of 1st April 2010 to 31st March 2015 regarding the Audited report submitted by Audit department under section 105 of the MMC Act but during inspection documents of the said fiscal year were not provided.
(Some copies provided are not clear)

| | |
|---|---|
| 7. Particulars of information<br>a) Nature and subject matter of the information required | As per Annexure "A" attached. |
| b) Name of the officer or Department to which the information relates | Public Information Officer,<br>Shri Kailash Mhatre<br>Municipal Secretary Dept.- MBMC |

Place: Bhayander
Date: 08/11/2019







**Pravin Parmar**

Application Under the Right To Information Act 2005
ANNEXURE "A"
(See Rule 3)

10 रु. Rs.10
- 3 SEP 2019
दस रुपये TEN RUPEES

To,
**The Public Information Officer,**
**Municipal Secretary - MBMC**

1) Full Name of Applicant : **Pravin Parmar**

2) Address : Email : pravinparmar.981@gmail.com

Contact No: 9819489991

1, Everest Hill Apt.
Near Siddhivinayak Hospital.
Navghar Road, Bhayander (east).
Thane : 401105.

3) Particulars of information required

i. subject matter of information. :

With reference to Section 105 of the MMC act Provide the following information.

ii. Period to which information relates : **1st April 2010 to 31st March 2015.**

iii. Description of information required :

1) **Year wise** provide inspection of all reports and record received by your office under **section 105 and its sub clauses read along with relevant sections of the Act.**

Provide copies selected after inspection of above documents.

iv. Whether information is required by post Or in person. : In Person / Email.

V. in case by post: : No

Whether the applicant is below poverty line. : No

Place: Mumbai
Date: 21/09/2019

माहिती अधिकारी
21/9/19

Pravin Parmar

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./३४/2019 दिनांक :- १५/१०/2019

**प्रति,**

**श्री. प्रविण परमार,**
**1, एव्हरेस्ट हिल अर्पा.**
**सिध्दीविनायक हॉस्पीटलजवळ,**
**नवघर रोड, भाईंदर (पूर्व)**
**ठाणे - 401 105**

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 21/09/2019 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रांन्वये आपण, दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 105 अन्वये लेखापरिक्षण विभागामार्फत् स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी प्राप्त साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल पडताळणीसाठी मागणी केली आहे.

नगरसचिव विभागातील अभिलेख्यांचे अवलोकन केले असता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 105 अन्वये साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतच्या स्थायी समिती सभांच्या विषयपत्रिकेवर दिसून येत नाही.

तथापी, सन 2015-16 पासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 105 अन्वये स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी प्राप्त साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल आपणांस पडताळणीसाठी या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./34/2019, दि. 04/10/2019 अन्वये सोमवार दि. 07/10/2019 रोजी सकाळी 11.00 वाजताची वेळ देण्यात आली होती.

आपण अभिलेख पडताळणी करुन मा. स्थायी समिती सभा दि. 11/02/2019, प्रकरण क्र. 203, दि. 15/02/2019, प्रकरण क्र. 229, दि. 06/06/2019, प्रकरण क्र. 49 व दि. 24/07/2019, प्रकरण क्र. 51 च्या गोषवाऱ्यासोबतच्या कागदपत्रांची मागणी केलेनुसार आपणांस उक्त कागदपत्रांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देत आहोत.

यासाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 239 पानांकरिता रुपये 478/- (अक्षरी रुपये चारशे अठ्याहत्तर मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

कळावे.

**(कैलास वा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अपिल/03/2019 दिनांक :- 06/12/2019

प्रति,
**श्री. प्रविण परमार,**
**1, एव्हरेस्ट हिल अर्पा.**
**सिध्दीविनायक हॉस्पीटलजवळ,**
**नवघर रोड, भाईंदर (पूर्व)**
**ठाणे - 401 105**

**विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :- 1) आपणांकडील दि. 08/11/2019 रोजीचा प्रथम अपिलीय अर्ज.**
**2) आपणांकडील दि. 29/08/2019 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपण दि. 29/08/2019 रोजी माहिती अधिकार नियमाअंतर्गत दाखल केलेल्या अर्जान्वये दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतच्या स्थायी समितीसंबंधीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 105 अंतर्गत प्राप्त अहवाल पडताळणी करुन लेखापरिक्षण अहवालातील कागदपत्रांची मागणी होती. उक्त माहिती आपणांस या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./34/2019, दि. 01/11/2019 अन्वये देण्यात आली आहे. आपणांस देण्यात आलेली माहिती परिपूर्ण नसल्याचे कळवून आपण प्रथम अपिल दाखल केले आहे.

आपल्या अपिलीय अर्जावर दि. 21/11/2019 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमक्ष सुनावणी आयोजित केली असता, प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी आपल्या अपिलीय अर्जावर निर्णय दिलेला आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी लेखापरिक्षण विभागाकडून नगरसचिव विभागामध्ये स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी प्राप्त झालेल्या सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवालांची दिनांकनिहाय यादी बनवून घ्यावी. अपिलार्थी यांना पुरविलेल्या माहितीशिवाय एखादा साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल देणे बाकी असल्यास त्याची प्रत अपिलार्थी यांना विनामुल्य देण्यात यावी.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, नगरसचिव विभागातील स्थायी समिती सभेसंबंधीत अभिलेख तपासला असता, आपणांस दि. 01/11/2019 रोजी देण्यात आलेल्या मा. स्थायी समिती सभा दि. 11/02/2019, प्रकरण क्र. 203, दि. 15/02/2019, प्रकरण क्र. 229, दि. 06/06/2019, प्रकरण क्र. 49 व दि. 24/07/2019, प्रकरण क्र. 51 या साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाला व्यतिरीक्त नगरसचिव विभागाच्या अभिलेखी साप्ताहीक लेखापरिक्षण अहवाल दिसून येत नाही.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

reply received
23/12/19

pc 2\\pranali\D\Mahiti Adhikar\Letter - Pravin Parmar.docx

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/अपिल/03 /2019-20

दिनांक :- १४ / ११/2019

प्रति,
श्री. प्रविण परमार,
1, एव्हरेस्ट हिल अर्पा.
सिध्दीविनायक हॉस्पीटलजवळ,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व)
ठाणे - 401 105

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
महानगरपालिका कलम 105 अन्वये माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 08/11/2019 रोजीचा अपिलीय अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्राच्या अनुषंगाने आपण दि. 21/09/2019 रोजी माहिती अधिकार नियमाअंतर्गत दाखल केलेल्या अर्जावर संदर्भित प्रथम अपील दाखल केलेले आहे.

आपण दाखल केलेल्या अपिलीय अर्जावर दि. 21/11/2019 रोजी सकाळी 10.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीच्या वेळी आपण उपस्थित रहावे.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

-2019
00 pm

# मिरा भाईदर महानगरपालिका

**जा.क्र.मा.अ./अपिल/03/2019**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव**
**मिरा भाईदर महानगरपालिका.**
**दि. 21/11/2019**

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा नगरसचिव मिरा भाईदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19(1) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

**...... अपिलार्थी**

**श्री. प्रविण परमार**
**1, एव्हरेस्ट हिल अर्पा.**
**सिध्दीविनायक हॉस्पीटलजवळ,**
**नवघर रोड, भाईंदर (पूर्व)**
**ठाणे - 401 105**

**विरूध्द**

**...... प्रतिवादी**

**जनमाहिती अधिकारी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**:- विवेचन :-**

अपिलार्थी श्री. प्रविण परमार, राहणार 1, एव्हरेस्ट हिल अर्पा. सिध्दीविनायक हॉस्पीटलजवळ, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार जन माहिती अधिकारी, यांचेकडे दि. 21/09/2019 रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 105 नुसार स्थायी समितीसमोर दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल पडताळणी करुन कागदपत्र मिळणेबाबत.

**अपिल दाखल करण्याची कारणे :-**

दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध करुन दिले नाहीत म्हणून अपीलार्थी यांनी दि. 08/11/2019 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.

**सुनावणीचा तपशिल :-**

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगरसचिव विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि. 21/11/2019 रोजी सकाळी 10.30 वाजता उपस्थित राहण्याबाबत पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अपिल/ 03/2019-20, दि. 14/11/2019 अन्वये कळविण्यांत आले. उक्त सुनावणीस अपिलार्थी श्री. प्रविण परमार व जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग उपस्थित होते.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध करुन दिले नाहीत म्हणून प्रथम अपिल दाखल केलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी मला उपलब्ध करुन दिलेली माहिती परिपूर्ण नाही. मागणी केलेनुसार दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध करुन दिले नाहीत. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे पत्रामध्ये कोणत्या वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध करुन देत आहेत याचा उल्लेख नाही.

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

अर्जदार श्री. प्रविण परमार यांनी 21/09/2019 रोजीच्या माहिती अधिकार अर्जान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 105 नुसार स्थायी समितीपूढे प्राप्त दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवालांची पडताळणी करणेसाठी उपलब्ध करुन देणेस व पडताळणी झालेनंतर कागदपत्र उपलब्ध करुन देणेची मागणी केलेली आहे. दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंत लेखापरिक्षण विभागाकडून स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाले नव्हते. तथापी लेखापरिक्षण विभागाकडून सन 2019 मध्ये

साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल सचिव कार्यालयास प्राप्त असल्याने अर्जदारांस उक्त साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल पडताळणीसाठी दि. 07/10/2019 रोजी बोलाविण्यात आले होते. अर्जदार यांनी या दिवशी स्वत: उपस्थित राहुन अभिलेख पडताळणी केलेली आहे व त्यांस आवश्यक कागदपत्र उपलब्ध करुन देणेस सांगितले. अर्जदारांस दि. 15/10/2019 रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटी आवश्यक शुल्क भरणेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 105 अन्वये दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल स्थायी समिती सभांच्या विषयपत्रिकेवर दिसून येत नसल्याचे लेखी कळविले आहे. अर्जदार यांनी 239 पानांकरिता रुपये 478/- इतके शुल्क पावती क्र. 103110, दि. 01/11/2019 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केलेले आहे. अर्जदारांनी शुल्क भरणा केल्याने त्यांस दि. 01/11/2019 रोजी कागदपत्र देण्यात आली आहे. तसेच शुल्क भरणा पत्रामध्ये ज्या स्थायी समिती सभेमध्ये उक्त साप्ताहिक अहवाल ठेवण्यात आले त्या सभेचा दिनांक व प्रकरण क्रमांक नमुद करण्यात आलेला आहे.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

अर्जदार श्री. प्रविण परमार यांनी 29/08/2019 रोजीच्या माहिती अधिकार अर्जान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 105 नुसार स्थायी समितीपूढे प्राप्त दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवालांची मागणी केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणेनुसार दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंत लेखापरिक्षण विभागाकडून स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाले नव्हते. तथापी लेखापरिक्षण विभागाकडून सन 2019 मध्ये साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल सचिव कार्यालयास प्राप्त असल्याने अर्जदारांस उक्त साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल पडताळणीसाठी दिलेले होते व अर्जदारांनी पडताळणी करुन मागणी केलेली सर्व कागदपत्र अर्जदारांस मुदतीत दिलेली आहेत. तसेच शुल्क भरणा पत्रामध्ये सभेचा तारखा व प्रकरण क्रमांकाची नोंद करण्यात आलेली आहे.

**-: निर्णय :-**

अपिलार्थी श्री. प्रविण परमार यांनी दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतचे सर्व साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध करुन दिले नाहीत व जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्रामध्ये कोणत्या वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध करुन देत आहेत याचा उल्लेख केलेला नसल्याचे कळवून प्रथम अपिल दाखल केलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदार श्री. प्रविण परमार यांना दि. 15/10/2019 रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 105 अन्वये दि. 01 एप्रिल 2010 ते दि. 31 मार्च 2015 पर्यंतच्या स्थायी समिती सभांच्या विषयपत्रिकेवर साप्ताहिक लेखापरिक्षण अहवाल मंजुरीस्तव ठेवल्याचे दिसून येत नसल्याचे लेखी कळविले आहे. तसेच अतिरीक्त माहिती म्हणून लेखापरिक्षण विभागाकडून सन 2019 मध्ये स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यात आलेल्या साप्ताहिक लेखा परिक्षण अहवालातील कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जदारांच्या मागणीनुसार दिलेल्या आहेत. तसेच शुल्क भरणा पत्रामध्ये स्थायी समिती सभेच्या तारखा व प्रकरण क्रमांकाची नोंद करण्यात आलेली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी लेखापरिक्षण विभागाकडून स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी नगरसचिव विभागामध्ये प्राप्त झालेल्या सर्व लेखापरिक्षण अहवालांची दिनांकनिहाय यादी बनवून घ्यावी. अपिलार्थी यांना पुरविलेल्या माहितीशिवाय एखादा लेखापरिक्षण अहवाल देणे बाकी असल्यास त्याची प्रत अपिलार्थी यांना विनामुल्य देण्यात यावी.

अपिलार्थी यांना पुरविलेल्या माहिती व्यतिरिक्त आणखीन पुरक माहिती नसल्यास तसे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना लेखी कळवावे.

**(वासुदेव शिरवळकर)**
**अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

1) **श्री. प्रविण परमार**
**1, एव्हरेस्ट हिल अर्पा. सिध्दीविनायक हॉस्पीटलजवळ,**
**नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105**

2) **जनमाहिती अधिकारी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

3) **माहिती अधिकार अपील नस्ती**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**नगरसचिव यांचे कार्यालय**

# नगरसचिव कार्यालय

दि. २१/११/२०१९

श्री. प्रविण परमार यांनी दि. २१/०९/२०१९ रोजी दाखल केलेल्या अर्जावर माहिती पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने दि. ०८/११/२०१९ रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलीय अर्जावर दि. २१/११/२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, आयुक्त दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस खालील अर्जदार / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री./श्रीम. प्रविण परमार (अर्जदार) | |
| २ | श्री./श्रीम. वासुदेव शिरवळकर अपिलीय अधिकारी | |
| ३ | श्री./श्रीम. कैलास दामोदर खाटे जनमाहिती अधिकारी | |
| ४ | श्री./श्रीम. ---------------------------------------- | |